# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६, फॅक्स क्रं.:- ०७१२-२५६१६६३

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in


**तात्काळ**

**अतिमहत्वाचे**

क्रमांक :- तंशिस/विकाना/ईबीसी/2017/ 1425

दिनांक 31 MAY 2017

प्रति,

संचालक/प्राचार्य,
सर्व पदवी/पदविका/पदव्युत्तर पदवी संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय :- शैक्षणिक वर्ष 2017-18पासून "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता" योजनेच्या विद्यार्थ्यांस ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी DBT Portal सुरू करण्यासाठी.

संदर्भ :- मा. संचालक, क्र18/तंशिसं/DBT Portal/2017-18/59/दि. 11.5.2017.

उपरोक्त संदर्भियान्वये आपणास कळविण्यात येते की, "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना" या योजनांतर्गत निर्धारित केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सक्षम प्राधिका-यामार्फत केंद्रीभुत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या 50 टक्के लाभार्थ्यास शिष्यवृत्ती स्वरूपात थेट त्यांच्या आधार संलग्नित बॅक खात्यात जमा करण्यासाठी तसेच या योजनांचा थेट लाभ देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या **Maha IT मार्फत "राज्य डिबीटी पोर्टल"**(State DBT Portal) 2017-18 पासुन विकसित करण्यात येत आहे.(मार्गदर्शक सुचना यासोबत जोडण्यात येत आहे.

तरी आपल्या संस्थेतील लाभार्थी विद्यार्थ्याना मार्गदर्शक सुचना,सुचनाफलकावर दर्शनियस्थळी लावण्यात याव्यात. जेणेकरून लाभार्थी विद्यार्थी या योजनेपासुन वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

सहपत्र :- वरीलप्रमाणे

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर.

2) प्रोग्रामर,तंशिविका.नागपूर. सदरहू पत्र संकेतस्थळावर अपलोड करण्याकरीता.

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना

अ) विदयार्थ्यासाठी सर्वसामान्य सूचना: -

महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र आधार ( वित्तीय व इतर अर्थ सहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्षित वितरण) अधिनियम, २०१६" हा अधिनियम पारित केलेला आहे. सदर अधिनियमाची कलमे ३ व ४ मध्ये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि १३/०४/२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे विभागाच्याखालील योजनांचा समावेश केला आहे.

१. **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना**
२. **डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना**

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता हि योजना लागू राहील.

| अ. क्र. | तपशिल | अंतर्भुत अभ्यासक्रम |
|---|---|---|
| १ | पदविका | अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी |
| २ | पदवी | अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी |
| ३ | पदव्युतर पदवी | मास्टर ऑफ बिझिनेस मॅनेजमेंट / मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मास्टर ऑफ कंप्युटर अप्लिकेशन |

विद्यार्थ्यांना उपरोक्त योजनांचा थेट लाभ देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या Maha IT मार्फत "राज्य डिबीटी पोर्टल ( State DBT Portal)" विकसित करण्यात येत आहे. या पोर्टलवर विद्यार्थ्याला उपरोक्त योजनेचा लाभ घेण्याकरिता ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. या पोर्टल बाबत अधिक माहिती तंत्र शिक्षण संचालनालयाच्या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येईल.

आधार क्रमांक वापरूनच अर्ज करण्यापासून ते लाभाची रक्कम थेट विद्यार्थ्याच्या खात्यात जमा करण्यापर्यंतची सर्व प्रक्रीया ऑनलाईन पद्धतीने राज्य डिबीटी पोर्टलद्वारे करण्यात येणार आहे.

१. उपरोक्त नमुद योजनाकरीता State DBT Portal वरील वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक आहे.
२. संस्थेत महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ /विद्यापीठाने ठरविलेल्या निकषाप्रमाणे वर्गातील ५०% उपस्थिती असणे अनिवार्य आहे.
३. शिष्यवृत्ती प्राप्त झाल्यानंतर संस्थेला वेळेत शिक्षण शुल्क भरण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची असेल.
४. ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही आधार क्रमांक प्राप्त केला नाही त्यांनी नजीकच्या UADAI यांनी निर्देशित केलेल्या केंद्राकडून नाव नोंदणी करून आधार क्रमांक प्राप्त करून घ्यावे.
५. आधार क्रमांकासोबत मोबाईल क्रमांक संलग्नित करावा.
६. योजनेचा लाभ थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात करण्यात येणार असल्याने, विद्यार्थ्यांनी CBS Facility असलेल्या बँकेत स्वतःचे खाते उघडले नसल्यास त्वरित खाते उघडून घ्यावे व सदरहू खाते आधार सोबत संलग्नीत करण्यात यावे.
७. आधार क्रमांक व बँक खाते संलग्नीत असल्याची खात्री खालीलप्रमाणे करता येईल.

- आधार क्रमांकाशी सालाग्नित मोबाईल क्रमांका वरून *९९*९९# क्र. डायल करावा.
- खालील संकेत स्थळावर जाऊन आधार व बँक खाते यांची जोडणी बघता येऊ शकेल
    - https://resident.uidai.gov.in/check-aadhaar-linking-status

सदर योजनांबाबत शासन निर्णय क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४ दि. १५/०४/२०१७ नुसार शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कार्यवाही करण्यात येणार असल्यामुळे सर्व विद्यार्थी, पालक व शैक्षाणिक संस्था यांनी शासन निर्णयाचे अवलोकन करावे. तसेच योजनेच्या अटी व शर्ती नुसार पात्र विद्यार्थ्यांनी आवश्यक असलेले सर्व कागदपत्रे /प्रमाणपत्रे विहित वेळेत प्राप्त करून घ्यावीत. तसेच सर्व सबंधित संस्था प्रमुखांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

आधिक माहिती www.dtemaharashtra.gov.in/dbt.html वर उपलब्ध आहे.

ई मेल : dbt@dtemaharashtra.gov.in

ब ) संस्थेसाठी सर्वसामान्य सूचना:-

१) पात्र विद्यार्थ्यांकडून State DBT Portal वर विहित वेळेत नोंदणी करून घेणे आवश्यक आहे.

२) संस्था स्तरावर समन्वयकाची नेमणूक करून DBT Cell स्थापन करणे, विद्यार्थ्यांना वेळोवेळी सुचना/ मार्गदर्शन देण्याचे काम DBT कक्षाद्वारे केले जाईल.

३) State DBT पोर्टलचा वापर करूनच अर्ज करण्यापासून ते रक्कम खात्यात जमा करण्यापर्यंतची सर्व प्रक्रीया ऑनलाईन पद्धतीने होईल.

४) लाभार्थी विद्यार्थ्यांच्या अर्जाची छाननी प्रक्रीया संस्था स्तरावर प्रथम दर्शनी अवलंबने आवश्यक असेल.

५) संस्थानी State DBT पोर्टलवर प्रकाशित केलेल्या वेळापत्रक प्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

६) संस्थांनी केंद्र शासनाच्या http://aishe.org.in या संकेत स्थळावर AISHE- Code प्राप्त करून घेणे आवश्यक आहे.

७) दैनंदिन उपस्थिती पारदर्शीपणे नोंदविणे आवश्यक असेल.

- सर्व विद्यार्थ्यांची उपस्थिती Aadhaar Based Biometric Attendance System द्वारे नोंदवणे आवश्यक आहे.
- ऑक्टोबर २०१७ पर्यंत सर्व अशासकीय / शासन अनुदानित संस्थांनी Aadhaar Based Biometric Attendance System प्रणाली प्रस्थापित करणे अनिवार्य आहे त्यासाठी आवश्यक उपकरणाची खरेदी संस्थांनी स्वखर्चाने करावी. सर्व शासकीय संस्थाना संचालनालया द्वारे Aadhaar Based Biometric Attendance System उपकरणे खरेदी करून दिली जातील.
- शैक्षणिक संस्थामध्ये उपकरणे खरेदी करित असतांना हि उपकरणे STQC व UADAI प्रमाणित असावी त्या बाबतची सूचना स्वतंत्रपणे प्रकाशित केली जातील.

८) संबधित संस्थानी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काच्या ५०% पर्यंतची रक्कम विद्यार्थ्यांकडून घेवू नये.

- पात्र उमेदवारास शिष्यवृत्ती नियमाप्रमाणे देण्यात येईल.

९) आधारक्रमांक /सत्रनिहाय उपस्थितीचा व परीक्षेबाबतचा अहवाल सादर करणे संस्थेस बंधनकारक राहील.

१०) उमेदवारास पात्र करण्यापूर्वी त्याची ५०% उपस्थिती असण्याची खात्री करावी.

११) Autonomous Institutes यांनी state DBTपोर्टल सोबत जोडणी करण्याकरिता (AISHE Code व University /MSBTE Enrollment No.) Database तयार ठेवावा.

१२) DBT पोर्टल अंमलबजावणी बाबतच्या सर्व मार्गदर्शक सुचना DBT पोर्टलवर उपलब्ध असतील. त्यांचे वेळोवेळी अवलोकन करून योग्य ती कार्यवाही संस्थेने करणे बंधन कारक राहील.